**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू महाराष्ट्राच्या दौऱ्यावर
- बिनचूक मतदार याद्या हा लोकशाहीचा पाया असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्तांचं प्रतिपादन
- चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत देशाची अर्थव्यवस्था ८ पूर्णांक १ दशांश टक्के वेगानं वाढल्याचा भारतीय स्टेट बँकेचा अहवाल
- महाराष्ट्रात काल अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीच्या सर्वेक्षणाचे आदेश देण्याचं महसूल मंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन
- महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या तालिका अध्यक्षांची नियुक्ती

**आणि**

- एआय इंपॅक्ट समिट निदर्शनांप्रकरणी युवक काँग्रेस अध्यक्ष उदयभानू चिब यांना अटक

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. मुंबईत लोकभवन इथं हिंदुजा हॉस्पिटलनं आयोजित केलेल्या 'जीवरक्षण आणि तंदुरुस्त भारताची निर्मिती' या देशव्यापी मोहिमेचं उद्घाटन आज राष्ट्रपतींच्या हस्ते होईल. त्यानंतर उद्या त्या शेगावमध्ये केंद्रीय आयुष मंत्रालयानं आयोजित केलेल्या 'राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याला उपस्थित राहणार आहेत. नागपूरमध्ये ब्रह्माकुमारींनी आयोजित केलेल्या 'एकता आणि विश्वासातून महाराष्ट्राचं सुवर्णयुग' उपक्रमाच्या उद्घाटन समारंभलाही त्या उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर त्या झारखंडला जाणार आहेत. तिथे येत्या गुरुवारी जमशेदपूर मधे श्री जगन्नाथ मंदिराच्या भूमिपूजन समारंभात सहभागी होतील. जमशेदपूरच्या मणिपाल टाटा मेडिकल कॉलेजलाही भेट देऊन त्या विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. त्यानंतर राष्ट्रपती राजस्थानसाठी रवाना होतील. येत्या शुक्रवारी राजस्थानात पोखरण इथं भारतीय हवाईदलाच्या, वायुशक्ती-2026 या कार्यक्रमाला राष्ट्रपती उपस्थित राहतील.

<><><><><>

बिनचूक मतदार याद्या कोणत्याही देशाच्या लोकशाहीचा पाया असल्याचं प्रतिपादन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथे भरलेल्या केंद्रीय निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयुक्तांच्या राष्ट्रीय गोलमेज परिषदेला संबोधित करत होते. देशातल्या अपात्र मतदारांना वगळून फक्त पात्र मतदारांना मतदार यादीत समाविष्ट करता यावं, यासाठी मतदार याद्यांचं विशेष पुनरीक्षणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. बिहारमध्ये ही प्रक्रिया कोणत्याही आक्षेपाशिवाय पूर्ण झाली. सध्या १२ राज्यांमध्ये मतदार याद्यांचं पुनरीक्षण सुरू असून त्यापैकी ११ राज्यांनी त्यांच्या मतदार याद्या जाहीर केल्या आहेत, असं ज्ञानेश कुमार यांनी या परिषदेत सांगितलं. केंद्रीय निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयुक्तांमधलं सहकार्य वाढवण्याच्या उद्देशाने या परिषदेचं आयोजन करण्यात आल्याचं निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू यावेळी म्हणाले.

या परिषदेत निवडणूक प्रक्रियेतला तंत्रज्ञानाचा सहभाग, ईव्हीएम, मतदार याद्यांची देवाण-घेवाण यांवर चर्चा होणार आहे. १९९९मध्ये या परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यानंतर आता २७ वर्षांनी ही परिषद आयोजित करण्यात आली आहे.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत देशाची अर्थव्यवस्था ८ पूर्णांक १ दशांश टक्के वेगानं वाढल्याचा अंदाज भारतीय स्टेट बँकेच्या आज प्रसिद्ध झालेल्या संशोधन अहवालात व्यक्त केला आहे. ३१ डिसेम्बर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीत आर्थिक कामकाज लवचिक राहिल्याचं उच्च वारंवारता निर्देशांकांवरून दिसून येत असल्याचं यात म्हटलं आहे. कृषी आणि बिगर कृषी या दोन्ही क्षेत्रातला ग्रामीण भागातला खप मजबूत राहिल्याचं, तर शहरी भागातला खपही गेल्या सणासुदीच्या हंगामापासून स्थिर गतीनं वाढत असल्याचं अहवालात नमूद केलं आहे.

आता २०११-१२ ऐवजी २०२२-२३ या नवीन आधार वर्षानुसार जीडीपीची नवीन आकडेवारी येत्या शुक्रवारी जारी होईल.

<><><><><>

केंद्र सरकारच्या मालमत्ता मौद्रीकीकरण उपक्रमामुळे देशाच्या जीडीपीमध्ये आगामी ५ ते १० वर्षांमध्ये सुमारे ४० लाख कोटी रुपयांची वाढ अपेक्षित आहे. नीती आयोगानं याबाबत प्रसिद्ध केलेल्या अहवालात ही माहिती दिली आहे. मालमत्ता मौद्रीकीकरणामुळे पायाभूत

सुविधांमधल्या गुंतवणुकीला मोठी चालना मिळेल तसंच विद्यमान सार्वजनिक मालमत्तांची किंमत कमी होऊन अर्थव्यवस्था विकासाला हातभार लागेल, असं यात म्हटलं आहे.

<><><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर यांनी आज एस्टोनियाचे परराष्ट्र मंत्री मार्गस त्साहकना आणि तिथल्या नागरिकांना स्वातंत्र्य दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. डॉक्टर जयशंकर यांनी उभय देशांतले  मैत्रीपूर्ण संबंध आणखी मजबूत करण्याची वचनबद्धता समाजमाध्यमांवरच्या पोस्टमध्ये व्यक्त केली.

<><><><><>

राज्यात मराठवाडा, विदर्भासह कोकणाच्या अनेक भागांत काल पडलेल्या अवकाळी पावसामुळे पिकांच्या झालेल्या नुकसानाचं सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले जातील असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत सांगितलं. कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय मुंडे यांनी स्थगन प्रस्तावाच्या सूचनेत हा मुद्दा उपस्थित केला. तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी वडेट्टीवार आणि मुंडे यांनी केली.

<><><><><>

अमली पदार्थांबाबत सरकारचं शून्य सहिष्णुता धोरण आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. अमली पदार्थांची तस्करी करण्याचे वेगवेगळे मार्ग शोधले जात आहेत, कुरिअरद्वारे अमली पदार्थ पाठवले जात असल्याचं आढळून आलं असून अशा कुरिअरवर कारवाई केली जाईल, अमली पदार्थ विक्रीत दोषी ठरलेल्या पोलिसांना बडतर्फ केलं जात आहे असंही त्यांनी सांगितलं. नसिम खान, वरूण सरदेसाई यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

<><><><><>

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातल्या कामकाजासाठी तालिका अध्यक्षांच्या नियुक्तीची घोषणा आज विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधानसभेत केली. योगेश सागर, संजय केळकर, दिलीप लांडे, चंद्रकांत नवघरे, सुनिल प्रभू, राजू खरे, अमित झनक आणि समाधान आवताडे हे तालिका अध्यक्ष म्हणून काम पाहतील.

विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आज चित्रा वाघ, कृपाल तुमाने, विक्रम काळे, राजेश राठोड, सुनील शिंदे यांची तालिका सभापती म्हणून घोषणा केली. त्यापूर्वी प्रज्ञा सातव यांचा विधान परिषद सदस्य पदाचा राजीनामा मंजूर केल्याची घोषणा त्यांनी केली.

<><><><><>

अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या राजीनाम्याची मागणी करत आज महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनात धरणं आदोलन केलं. या सदस्यांनी यावेळी भाजपाच्या नेतृत्वाखालच्या महायुती सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप करत घोषणाबाजीही केली. मंत्रालयातल्या झिरवळ यांच्या विभागातल्या कारकुनाला लाचखोरीच्या आरोपावरुन या महिन्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकानं अटक केल्यामुळे झिरवळ यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधी पक्ष सदस्यांनी लावून धरली आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाची नवी राज्य कार्यकारिणी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज जाहीर केली. यामध्ये पक्षानं ११ नेत्यांची प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. त्यात अतुल कासेकर, भारती पवार, संजय कोडगे, संजय भेंडे, रामदास तडस, केशव उपाध्ये, प्रवीण पोटे, गोपीचंद पडळकर, चेतन देशमुख, सुजय विखे पाटील आणि अर्चना चाकोकर यांचा समावेश आहे. तर पक्षाचं प्रशासकीय कामकाज मजबूत करण्यासाठी निरंजन डावखरे, योगेश सागर, संजय कुटे, माधवी नाईक, राजेश पांडे आणि सुनील राणे यांची प्रदेश महासचिवपदी नियुक्ती केली आहे.

दहा जणांची प्रदेश सचिव म्हणून नियुक्ती केली असून त्यात प्रशांत ठाकूर, मंगेश चव्हाण, परिणय फुके, वर्षा डहाळे, संजय जगताप, रोहिणी नायडू, राम सातपुते, प्रवीण घुगे, रेखा कुलकर्णी आणि भैरवी वाघ यांचा समावेश आहे. आर्थिक प्रदेश कोषाध्यक्षपदी मिहिर कोटेचा तर सहकोषाध्यक्ष पदाची जबाबदारी अरुण लाखानी यांच्याकडे दिली आहे. नवनाथ बन यांच्याकडे राज्याचे मुख्य प्रवक्तेपद सोपवलं आहे.

दरम्यान, भाजपचं देशव्यापी प्रशिक्षण महाअभियानाला आजपासून मुंबईत सुरू होत आहे.

<><><><><>

नवी दिल्लीत एआय इंपॅक्ट समिटच्या वेळी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या आंदोलनासंदर्भात दिल्ली पोलिसांनी युवक काँग्रेसचे अध्यक्ष उदयभानू चिब यांना अटक केली आहे. याप्रकरणी आतापर्यंत ७ जणांना अटक झाली असून पटियाला हाऊस न्यायालयाने तपास पूर्णपणे दिल्ली पोलिसांच्या आंतरराज्य गुन्हे शाखेकडे सोपवला आहे.

<><><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सुपर एट गटात  आज इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यातली लढत श्रीलंकेत पल्लिकल इथं होणार आहे.  संध्याकाळी ७ वाजता हा सामना सुरू होईल.

काल रात्री मुंबईत वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सुपर ८ गटाच्या सामन्यात वेस्ट इंडिजनं झिम्बाब्वेचा १०७ धावांनी पराभव केला.   या विजयाबरोबर वेस्टइंडीजच्या नावे  २ गुण जमा झाले आहेत.

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना कर्नाटक आणि जम्मू काश्मीर या संघांमधे आजपासून कर्नाटकात हुबळी इथं  सुरु झाला.   जम्मू-काश्मीरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली आहे. जम्मू काश्मीरचा संघ प्रथमच अंतिम फेरीत पोहोचला आहे.

महिला क्रिकेटमधे भारत- ऑस्ट्रेलिया एकदिवसीय मालिकेतला पहिला सामना आज ऑस्ट्रेलियात ब्रिस्बेन इथं होत आहे. नाणेफेक जिंकून भारताने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतानं ४८ षटक आणि ३ चेंडूत सर्वबाद २१४ धावा केल्या असून ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी २१५ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

//<><><><><>//